**ठळक बातम्या**

- मुद्रा योजनेमुळं उद्योजकतेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- एक राज्य एक प्रादेशिक ग्रामीण बँक धोरणांतर्गत देशभरातल्या ४३ प्रादेशिक ग्रामीण बँकांचं एकत्रीकरण करुन २८ बँका होणार

- विधानसभेनं दुसऱ्यांदा मंजूर केलेली विधेयकं रोखण्याच्या तामिळनाडूच्या राज्यपालांच्या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

- जगभरातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी, देशातल्या गुंतवणूकदारांचं काल झालेलं निम्मं नुकसान भरुन निघालं

**आणि**

- ब्रह्माकुमारी संघटनेच्या प्रमुख राजयोगिनी दादी रतनमोहिनी यांचं निधन

**<><><><><>**

मुद्रा योजनेनं उद्योजकतेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. यामुळे महिलांना आर्थिक सहाय्य तर मिळालंच पण त्यांच्या व्यवसायाच्या विकासासाठी अनेक संधी निर्माण झाल्या असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मुद्रा योजनेला १० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं विविध लाभार्थ्यांशी नवी दिल्लीत चर्चा करताना ते बोलत होते.

***होल्ड प्रधानमंत्री***

देशातल्या तरुणांना सक्षम, स्वावलंबी करणं आणि त्यांना आत्मविश्वास मिळवून देणं तसंच केवळ नोकरी शोधणाऱ्यांऐवजी रोजगार निर्माण करण्याची क्षमता निर्माण करणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. या

योजनेतून ३३ लाख कोटी रुपयांची कर्ज कुठल्याही तारणाशिवाय वितरीत झाली आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><>**

दुबईचे युवराज आणि संयुक्त अरब अमिरातीचे प्रधानमंत्री शेख हमदन बिन मोहम्मद अल मकतुम यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत आज भेट घेतली.  भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातले धोरणात्मक संबंध दृढ करण्यात दुबईची महत्वाची भूमिका आहे. या भेटीमुळे हे संबंध अधिक बळकट होतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आणि इस्रायलचे कृषीमंत्री अवी डिचर यांनी आज नवी दिल्लीत कृषी क्षेत्रातल्या द्विपक्षीय सहकार्याशी संबंधित करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. आगामी काळात अन्न सुरक्षेच्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या रणनीतीसंदर्भात बैठकीत चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

वक्फ सुधारणा कायद्याचं अधिसूचना केंद्र सरकारनं आज जारी केल्यानं हा कायदा आजपासून देशभरात लागू झाला आहे. गेल्या आठवड्यात संसदेनं याला मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रपतींनी यावर स्वाक्षरी केली होती. यामुळं वक्फ बोर्डाचं मालमत्ता व्यवस्थापन पारदर्शक होणार असून वक्फ बोर्ड आणि स्थानिक प्रशासनातलं सामंजस्य वाढणार आहे.

**<><><><>**

राज्य मंत्रीमंडळानं आज नवीन वाळू धोरणाला मंजुरी दिली. याअंतर्गत घरांच्या बांधकामांसाठी ५ ब्रास वाळू मोफत दिली जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नव्या धोरणात डेपो पद्धत बंद करुन वाळू घाटांची निविदा काढली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड - चंद्रशेखर बावनकुळे**

**<><><><><>**

एक राज्य एक प्रादेशिक ग्रामीण बँक तत्वानुसार ४३ प्रादेशिक बँकांच्या एकत्रिकरणाची अधिसूचना केंद्रीय वित्तीय सेवा विभागानं जारी केली आहे.  सध्या, २६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून ४३ प्रादेशिक ग्रामीण बँका कार्यरत आहेत. एकत्रीकरणानंतर त्यांची संख्या २८ वर येईल. मात्र देशभरातल्या, ७०० जिल्ह्यांमध्ये मिळून त्यांच्या २२ हजारापेक्षा जास्त शाखा असतील.

राज्यात विदर्भ प्रादेशिक ग्रामीण बँक, महाराष्ट्र प्रादेशिक ग्रामीण बँकेत विलीन केली जाईल. १ मे पासून हे विलिनीकरण प्रत्यक्षात येईल. या एकत्रित बँकेचं मुख्यालय छत्रपती संभाजीनगरमधे असेल.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक्स कॉंपोनंट उत्पादन योजनेची अधिसूचना आज काढण्यात येईल असं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. अधिसूचना जाहीर झाल्यावर योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वं तयार करण्यासाठी उद्योजकांशी चर्चा केली जाईल. तसंच या योजने अंतर्गत अर्ज स्वीकारायला काही दिवसातच सुरुवात होईल असंही त्यांनी  सांगितलं.

**<><><><><>**

तमिळनाडू विधानसभेने दुसऱ्यांदा मंजूर केलेली १० विधेयकं रोखून धरण्याची राज्यपाल आर एन रवि यांची कृती बेकायदेशीर, आणि त्रुटीपूर्ण असून रद्द करण्यायोग्य असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या विधेयकांवर जर राष्ट्रपतींनी काही कारवाई केली असली तर ती देखील रद्दबातल समजण्यात यावी असं न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर महादेवन यांच्या पीठाने म्हटलं आहे. या दहापैकी सर्वात जुनं विधेयक २०२०मधलं आहे. राज्यविधानसभेने मंजूर केलेलं विधेयक स्वाक्षरीसाठी प्राप्त झाल्यावर राज्यपालांना

फक्त एकदाच ते राष्ट्रपतींच्या अभिप्रायासाठी रोखता येतं. मात्र विधानसभेनं पुन्हा एकदा तेच विधेयक मंजूर करुन पाठवल्यास रोखता येणार नाही.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये आज बिजापूर जिल्ह्यात २२ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. त्यातल्या चौघांवर २६ लाख रुपयांचं बक्षीस होतं. यावर्षी बिजापूर जिल्ह्यात १८० नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे.

<><><><><>

काँग्रेसच्या केंद्रीय  कार्यकारिणीची बैठक आज गुजरातमध्ये अहमदाबाद इथं झाली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह दीडशे प्रतिनिधी उपस्थित होते. आजच्या बैठकीत पक्षाच्या पुनर्बांधणीबाबत चर्चा झाल्याचं काँग्रेसचे महासचिव के सी वेणुगोपाल यांनी वार्ताहरांना सांगितलं.

<><><><><>

राजस्थानात जयपूरच्या नाहरगडमध्ये काल रात्री मद्यधुंद चालकानं ९ जणांना चिरडून ठार केलं तर ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. नागरिकांनी चालकाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केलं असून आतापर्यंत दोन एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पोर्तुगाल दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी आज पोर्तुगालच्या संसदेला भेट दिली. तिथं त्यांना पारंपरिक मानवंदना देण्यात आली. सभापती जोस पेद्रो अग्वार ब्रांको यांच्याशी आणि इतर संसद सदस्यांशी त्यांनी सौहार्दपूर्ण चर्चा केली. राष्ट्रपतींनी  चंपालमो फाऊंडेशन आणि राधाकृष्ण मंदिराला भेट दिली. त्यानंतर अलमेडा इथं राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुतळ्यावर

आदरांजली अर्पण केली. पोर्तुगालमधल्या भारतीय समुदायाशी त्यांनी संवाद साधला.

<><><><><>

जगभरातल्या बाजारातली तेजी आणि रिझर्व्ह बँकेकडून उद्या पाव टक्के व्याजदर कपातीची आशा यामुळे देशातल्या शेअर बाजारांनी काल झालेलं निम्मं नुकसान आज भरुन काढलं. तीन दिवसानंतर तेजीत बंद झालेला सेन्सेक्स आज १ हजार ८९ अंकांची वाढ नोंदवून ७४ हजार २२७ अंकांवर बंद झाला. निफ्टी पावणे ४०० अंकांच्या वाढीसह २२ हजार ५३६ अंकांवर स्थिरावला.

युरोपियन बाजार आज ३ टक्क्यांपर्यंत, जपानी बाजार ६ टक्क्यांपर्यंत वधारले होते. अमेरिकी बाजारातही थोडीफार तेजी होती.

सोन्याचे दर आज तोळ्यामागे ५०० रुपयांनी घसरले आणि २२ कॅरेट सोनं ९१ हजार २०० रुपये तोळ्यानं विकले जात होतं. चांदीचे दर ९० हजार ३०० रुपये किलो दरावर जवळपास समान होते.

<><><><><>

ब्रह्माकुमारी संघटनेच्या प्रमुख राजयोगिनी दादी रतनमोहिनी यांचं आज पहाटे अहमदाबादमध्ये निधन झालं. त्या १०१ वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर गुरुवारी अंत्यसंस्कार होणार आहेत. तोपर्यंत त्यांचं पार्थिव ब्रह्माकुमारीच्या मुख्यालयात अंतिम दर्शनासाठी ठेवलं जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

वेव्ज उपक्रमाअंतर्गत आयोजित ट्रूथ टेल हॅकेथॉनच्या पहिल्या ५ विजेत्यांची नावं जाहीर झाली आहेत. युनिकॉर्न, अल्केमिस्ट, व्हूशिंग लायर्स, बग स्मॅशर्स, आणि व्होर्टेक्स स्क्वाड या संघांना १० लाख रुपयांचं बक्षीस मिळालं आहे. चुकीची माहिती पसरु नये याकरता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन उपाय शोधून

काढल्याबद्दल हे सामायिक बक्षीस नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात देण्यात आलं . या स्पर्धेसाठी जगभरातून पाचहजार सहाशे प्रवेशिका आल्या होत्या. वेव्ज परिषद येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सनं कोलकाता नाईट रायडर्सवर ४ धावांनी विजय मिळवला. लखनौनं प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ३ बाद २३८ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना कोलकाता नाईट रायर्डसला २० षटकात ७ गडी गमावून २३४ धावाच करता आल्या.

स्पर्धेतला आजचा दुसरा सामना पंजाबमधे मोहाली इथं चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आला तेव्हा त्यांच्या ७ षटकात ३ बाद ८१ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**